DAY — **10** SEAT NUMBER | | | | | | |

2025	II	24	1100	**J-329**	(M)

ANIMAL SCIENCE AND TECHNOLOGY (76)

Time : 3 Hrs. **(4 Pages)** **Max. Marks : 70**

सूचना : *(१) सर्व प्रश्न सोडवणे अनिवार्य आहे.*

(२) आवश्यक तेथे सुबक आकृती काढा.

(३) उजवीकडे दिलेले आकडे प्रश्नांचे पूर्ण गुण दर्शवितात.

(४) सर्व प्रश्नांची उत्तरे नवीन पानांवर लिहावीत.

प्र. १. **(अ)** प्रश्नांच्या खाली दिलेल्या पर्यायांमधून योग्य पर्याय निवडून विधाने पूर्ण करा : (५) **[१८]**

(१) शेळीच्या मांसाला ------ असे म्हणतात.

(अ) मटण

(ब) चेवान

(क) पोर्क

(ड) बीफ

(२) एक मेंढी वर्षाला सरासरी ------ ग्रॅम लोकरीचे उत्पादन देते.

(अ) ४८०

(ब) ५८०

(क) ६८०

(ड) ७८०

(३) कुक्कुटपिलांस कृत्रिम ऊब देण्यासाठी ------ चा वापर करतात.

(अ) इन्क्युबेटर

(ब) कॅण्डलर

(क) ब्रूडर

(ड) डीबीकर

(४) लाळ्या खुरकत (FMD) रोग ------ मुळे होतो.

(अ) विषाणू

(ब) जिवाणू

(क) बुरशी

(ड) आदिजीव

(५) ------ पद्धतीचा वापर सर्वसामान्यपणे म्हशीतील वासरे व वराहामध्ये ओळखचिन्ह देण्यासाठी केला जातो.

(अ) टॅगींग (Tagging)

(ब) गोंदणे (Tattooing)

(क) डागणी (Branding)

(ड) कानाला खाच पाडणे (Ear notching)

(ब) खालील जोड्या जुळवा : (४)

'अ' गट	'ब' गट
(अ) ब्रायलर (Broiler)	(१) बाह्यपरोपजीवी नियंत्रण
(ब) डिपींग (Dipping)	(२) मरेक्स रोग
(क) एच.व्ही.टी (HVT)	(३) मांस हेतू
(ड) लॅक्टोज (Lactose)	(४) आंतरपरजीवी नियंत्रण
	(५) दुग्धशर्करा
	(६) राणीखेत रोग

(क) खालील विधाने 'बरोबर' की 'चूक' ते सांगा : (५)

(१) 'कमी तापमान जास्त वेळ' पाश्चरीकरण (LTLT) पद्धतीत दूध ६३° से तापमानास ३० मिनिटे तापवतात.

(२) नसबंदी केलेला वळू प्रजननक्षम असतो.

(३) शेळीचे दूध आम्लारीधर्मी असते.

(४) गाभण गायीचे नंतरच्या वेताच्या ६० दिवस आगोदर दूध काढणे थांबवतात.

(५) खवा हा दूध आटवून तयार केला जाणारा पदार्थ आहे.

(ड) गटातील वेगळा शब्द निवडा : (४)

(१) प्रतिजैविके ; विकरे ; जीवनसत्त्वपूरके ; प्रतिऑक्सीकारके

(२) गोचीड ; पट्टकृमी ; कोळी ; लिकु

(३) बासुंदी ; खवा ; पनीर ; खीर

(४) दूध ; बीफ ; चेवान ; चिकन

प्र. २. **(अ)** खालील व्याख्या लिहा (कोणतेही तीन) : (६) **[१२]**

(१) शेअरींग (shearing)

(२) सेंद्रिय दूध (organic milk)

(३) डिसबडींग (disbudding)

(४) मांस (meat)

(ब) खालील प्रश्नांची थोडक्यात उत्तरे लिहा (कोणतेही तीन) : (६)

(१) शेळीपालनाच्या पद्धती विशद करा.

(२) नवजात कोकराची काळजी लिहा.

(३) अंडी देणाऱ्या पक्षांच्या खाद्याचे प्रकार विशद करा.

(४) जनावरांच्या निवाऱ्याची उद्दिष्ट्ये सांगा.

(५) खच्चीकरणाच्या पद्धती विशद करा.

प्र. ३. खालील प्रश्नांची उत्तरे लिहा (कोणतेही तीन) : **[९]**

(१) व्याख्या- दायित्व पद्धत (weaning), दायित्व पद्धतीचे फायदे सांगा.

(२) शिंगे काढण्याचे फायदे व तोटे सांगा.

(३) गाभण शेळीची काळजी व व्यवस्थापन थोडक्यात लिहा.

(४) जनावरांच्या गोठ्यासाठी जागेची निवड करताना कोणकोणत्या बाबींचा विचार करावा.

(५) पर्यावरण नियंत्रित (Environment controlled) कुक्कुटपक्षी संगोपनाचे फायदे सांगा.

प्र. ४. खालील प्रश्नांची उत्तरे लिहा (कोणतेही चार) : **[१६]**

(१) कुक्कटपक्षांच्या खाद्यांचे उदाहरणासह वर्गीकरण करा.

(२) स्वच्छ दूध उत्पादन करण्याचे टप्पे लिहा.

(३) कुक्कुटपक्षांचे उन्हाळ्यातील व्यवस्थापन सविस्तर लिहा.

(४) 'शेपटीकडे- शेपटी' गोठा पद्धतीच्या आराखड्याची आकृती काढून नावे द्या.

(५) कुक्कुटपक्षातील 'देवी' (fowl pox) रोगाची कारणे व लक्षणे लिहा.

(६) भारतीय दुग्धजन्य पदार्थांचे वर्गीकरण करा. (Indigenous milk products)

प्र. ५. **(अ)** खालील प्रश्नांची सविस्तर उत्तरे लिहा (कोणतेही एक) : (७) **[१५]**

(१) अंडी देणाऱ्या (Layer) कुक्कुटपक्षांची काळजी व व्यवस्थापन लिहा.

(२) 'स्तनदाह' (Mastitis) रोगाची कारणे, प्रसार, लक्षणे व नियंत्रणाचे उपाय लिहा.

(ब) खालील प्रश्नांची सविस्तर उत्तरे लिहा (कोणतेही एक) : (८)

(१) पैदासीच्या वळूची काळजी व व्यवस्थापन लिहा . (Breeding bull)

(२) व्याख्या लिहा : दही

दही तयार करण्याचा प्रवाह तक्ता लिहा. (flow chart)

◆◆◆